उपवनसंरक्षक तथा
क्षेत्रसंचालक, नवेगांव-
नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र,
गोंदिया यांचे कार्यालय
कार्यालय:- "वनभवन"टिबीटोली,
कुडवारोड, गोंदिया(महाराष्ट्र) पीन
कोड नं.441614 फोन नं.07182-
250122,
ईमेल: cfwlgondia@mahaforest.gov.in

वन विभाग

Office of the Dy
Conservator of Forest
and Field Director
Nawegaon Nagzira Tiger
Reserve, Gondia
Office-Vanbhavan, T B Toli,
Kudwa Road, Gondia (MH)
PC No .441614 Ph No 07182-
250122,
Emailcfwlgondia@mahaforest.gov.in

क्रमांक: कक्ष-लले/2026-27/ 1200 गोंदिया, दिनांक 06/08/2026.

**अत्यंत महत्वाचे/तात्काळ**

**विषय:**- वनकर्मचाऱ्यांना गस्तीदरम्यान सुरक्षिततेबाबत विशेष सुचना.

--//--//--

दिनांक ०५.०८.२०२६ रोजी नियमित गस्ती दरम्यान घडलेल्या अत्यंत दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर वनकर्मचाऱ्यांची सुरक्षितता अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने पुढील सूचना तात्काळ प्रभावाने अंमलात आणण्यात याव्यात.

**१. गट पद्धतीने गस्त**

- यापुढे कोणत्याही परिस्थितीत एकट्याने गस्तीस जाऊ नये.
- प्रत्येक वन-वर्तुळ स्तरावर किमान चार (४) सदस्यांचा गस्ती गट तयार करण्यात यावा.
- या गटामध्ये संबंधित वनरक्षक/वनपाल यांच्यासोबत त्यांचे वर्तुळामध्ये नियुक्त रोजंदारी मजुरांचा समावेश करण्यात यावा.
- गस्तीचे नियोजन असे करावे की संपूर्ण गस्त एकाच गटाने एकत्रितपणे पूर्ण होईल त्या साठी m-stripe गस्तीचे टार्गेट वर्तुळ निहाय निश्चित करावे.

**२. रोजंदारी मजुरांची निवड**

- गस्तीसाठी नियुक्त करण्यात येणारे रोजंदारी मजुर शारीरिकदृष्ट्या सक्षम, मानसिकदृष्ट्या स्थिर व जंगलातील कामाचा अनुभव असलेले असावेत.
- आपत्कालीन परिस्थितीत धैर्याने सहकार्य करणारे व जबाबदारीने वागणारे व्यक्तीच निवडावेत.
- केवळ उपलब्ध आहेत म्हणून कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करू नये.
- विश्वासार्ह, जबाबदार व परीस्थितीचा सामना करण्यास सक्षम मजुरांची निवड करण्यात यावी.

**३. सुरक्षा साहित्याचा वापर**

गस्तीदरम्यान पुढील साहित्याचा वापर अनिवार्य राहील —

- संबंधित**APC कॅम्पमध्ये उपलब्ध Bear Spray** सोबत घेण्यात यावा.
- विभागाकडून उपलब्ध करून देण्यात आलेली **घुंगरू काठी** नियमितपणे वापरण्यात यावी.
- आवश्यकतेनुसार शिट्टी, टॉर्च, वायरलेस संच, मोबाईल इत्यादी साधने कार्यस्थितीत असल्याची खात्री करावीव वापरावी.

**४. सुरक्षा साहित्याची आवश्यकता**

- गस्तीदरम्यान आवश्यक असणारे कोणतेही सुरक्षा साहित्य उपलब्ध नसल्यास अथवा अतिरिक्त साहित्याची आवश्यकता असल्यास संबंधित वनक्षेत्रपाल (**RFO**) यांना तात्काळ लेखी अथवा दूरध्वनीद्वारे कळवावे.
- कोणत्याही कर्मचाऱ्याने आवश्यक सुरक्षा साहित्याच्या अभावी गस्ती करण्याची वेळ येऊ देऊ नये.

Scanned with OKEN Scanner

**५. गस्तीचे नियोजन**

- गस्तीपूर्वी मार्ग, वेळ, संभाव्य धोके व संपर्क व्यवस्था याबाबत गटामध्ये चर्चा करावी.
- दाट झाडी, नाले, अस्वलांची संभाव्य वस्ती, गुहा, वारुळे व कमी दृश्यमानता असलेल्या ठिकाणी विशेष सावधगिरी बाळगावी.
- गटातील सदस्यांनी एकमेकांच्या नजरेच्या व आवाजाच्या टप्प्यात राहूनच हालचाल करावी.

**6. जबाबदारी**

- संबंधित वन क्षेत्रपाल यांनी राऊंडनिहाय गटांची रचना करून त्याची नोंद ठेवावी.
- प्रत्येक गटाकडे आवश्यक सुरक्षा साहित्य उपलब्ध असल्याची खात्री करावी.
- सहाय्यक वनसंरक्षक यांनी वेळोवेळी या सूचनांच्या अंमलबजावणीचा आढावा घ्यावा.

**7. सर्वांनी पाळावयाची बाब**

वनरक्षकांचे जीवन आणि सुरक्षितता ही विभागाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. कोणतीही गस्त, तपासणी किंवा इतर क्षेत्रीय काम करताना अनावश्यक जोखीम टाळावी. **स्वत: सुरक्षित राहुनच प्रभावी वनसंरक्षण शक्य आहे,** ही बाब प्रत्येकाने कायम लक्षात ठेवावी.

**वरील सर्व सूचना तात्काळ प्रभावाने अंमलात आणण्यात याव्यात.**

करीता आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

(पियुषा जगताप)
**उपवनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक,**
**नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया.**

**प्रति,**

1. उपसंचालक,
   नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, गोंदिया (नागझिरा खंड).
2. विभागीय वन अधिकारी,
   नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र, साकोली (नवेगाव खंड).
3. सहाय्यक वनसंरक्षक (सर्व),
   नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र
4. वनपरीक्षेत्र अधिकारी (सर्व),
   नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र.

**प्रतिलिपी:-** मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पुर्व, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner